# अभिरुची

## दिवाळी विशेषांक २०२२

मराठी मंडळ सॅक्रमेंटो


vikrant sawant


IMPERIAL
vikrant sawant


Spartans


vikrant sawant


vikrant sawant

# ह्या अंकात ...


| | |
|---|---|
| संपादकीय | मधुरा फणसळकर-शेंडे |
| अध्यक्षीय | हृषीकेश शेंडे |
| **काव्यवाचन** | |
| कलरवची पहाट | चारुलता मुजूमदार |
| अमृत आणि विष | शिरीष देशपांडे |
| चित्रकथी | कविता जोशी-केतकर, मृदुला चोरडिया |
| **गोष्टींचा कट्टा** | |
| मऊ मेणाहूनही | कुमार कुलकर्णी |
| स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | वसुधा जोशी |
| राजयोग | श्रीधर जगदाळे |
| कृष्णापेक्षा मला अर्जुन हवाय, रामापेक्षा मला भरत हवाय ! | अजित नातू |
| मराठी शाळा सॅक्रमेंटो | शाळा संचालक |
| **बालमित्र** | |
| प्लास्टिक बंदी ? एक विचार | साहिल शेंडे |
| जीवनाची लढाई | आर्णव दाबके |
| चित्रकथी | उर्वी दखणे , सिद्धांत नाईक , विवान शेंडे , अस्मि चोरडिया, साहिल शेंडे, शनाया राणे ,आर्य कुलकर्णी, इरा कुलकर्णी |





प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

# संपादकीय

## मधुरा फणसळकर - शेंडे



नमस्कार मंडळी ,

आली दिवाळी दिवाळी काढू आनंदे रांगोळी

उजळवू सारे जग लावू दीपकांच्या ओळी

दिवाळीच्या आपणा सर्वांना खूप शुभेच्छा. सादर आहे दिवाळी २०२२ चा खास विशेषांक . मागील दिवाळी अंकाला तुम्ही उदंड प्रतिसाद दिलात त्याबद्दल खूप खूप आभार. याही वर्षी अनेक उत्साही कुटुंबीयांनी दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविले आहे.

हे वर्ष खास म्हणजे आपल्या मायभूमीचा , जन्मभूमीचा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ! 'वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम ' असा मंत्र देणारे आपले स्वातंत्र्यवीर !

त्या सर्व हुतात्म्यांचे स्मरण करून या अंकाची सुरुवात करूया.

या अंकात बरंच काही विशेष वाचायला मिळेल. मुक्तक काव्य , काही विशेष लेख , काव्यसंग्रह, बालमित्रांची चित्रकला आणि मंडळाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमातील अनेक फोटो यांनी हा अंक सजला आहे. आपल्या कुटुंबातील ९० वर्षांच्या आजीने (माझी आजी ) 'तिने अनुभवलेला पहिला स्वातंत्र्य दिन ' १५ ऑगस्ट १९४७ ' याविषयी लेख लिहून पाठविला आहे. हा अनुभव वाचून त्या दिवसाचे साक्षीदार तुम्हाला नक्की होता येईल.

मागील अंकाप्रमाणेच याही अंकात रांगोळीचे पान दिले आहे , तेव्हा त्यावर रांगोळी काढून mmsac.abhiruchi @gmail.com ला नक्की पाठवून द्या . आणि हो, मागील अंकाप्रमाणेच याही अंकाबद्दलचा अभिप्राय जरूर पाठवा.

तुमच्या सूचना आणि अभिप्राय हा खूप मोलाचा आहे आणि त्याप्रमाणे अंकात बदल करता येतील.

covid ची साथ आता बरीच आटोक्यात आली आहे . वातावरण आता पूर्ववत झाले आहे. आपल्या mmsac कुटुंबीयांनी एकमेकांची भक्कम साथ देऊन या कठीण काळाशी सामना केला . मंडळाचे कार्यक्रमही आता पूर्वीसारखे उत्साहात सुरु झाले आहेत आणि सभासदांमध्ये सुद्धा अनेक नवीन कुटुंबे सामील झाली आहेत. आपले कुटुंब दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे हे बघून विशेष आनंद वाटतो. चला तर मग आता इथेच थांबते, हाही अंक तुम्ही पूर्ण वाचाल आणि त्याचा आनंद घ्याल अशी आशा करते .

आपली स्नेहांकित

मधुरा फणसळकर - शेंडे




चित्र : कविता जोशी - केतकर

# अध्यक्षीय

## हृषीकेश शेंडे



नमस्कार मंडळी ,

दिवाळीच्या आपणा सर्वांना खूप शुभेच्छा. या सदरात आपण यावर्षीचा थोडक्यात आढावा घेऊया . या वर्षी नवीन कार्यकारिणीने मंडळाची सूत्रे हातात घेतली आणि योगायोग असा की या कार्यकारिणीत सॅक्रामेन्टो भागात नव्याने आलेल्या सदस्यांनी उत्साहाने भाग घेतला.

कार्यकारिणीने सूत्रे घेतल्यावर मंडळाचा पहिलाच रंगीबेरंगी कार्यक्रम 'होळी 'अगदी उत्साहात आणि थाटात साजरा झाला . गरम गरम पुरळ पोळी वर ताव मारत सगळ्यांनी दणक्यात रंगांचा आनंद घेतला. आणि कार्यक्रमाचे शूटिंग करायला विक्रांत सावंत यांचा कॅमेरा आणि ड्रोन सज्ज होताच त्यामुळे कार्यक्रमाची रंगत आणखीनच वाढली.

महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम यावर्षी थोडा वेगळ्या पद्धतीने साजरा केला गेला. गानसम्राज्ञी लता मंगेशकर आपल्या सर्वांना सोडून यावर्षी निघून गेल्या . त्यांच्या स्वर्गीय आवाजाची आठवण ठेवत मंडळाच्या गायक सभासदांनी लतादीदींची गाणी गाऊन त्यांना एक आद्ररपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

महाराष्ट्र दिन होत नाही तर वेध लागले आपल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाचे ! covid ची साथ आता बरीच आटोक्यात आलेली असल्यामुळे यावर्षी बाप्पाचे स्वागत ढोल ताशाच्या गजरात केले गेले . बे एरिया तून येऊन ढोल ताशा पथकानी दणक्यात ढोल ताशा सादर केला .. सगळे वातावरण मंत्रमुग्ध केले.
हे वर्ष खास म्हणजे आपल्या भारताचा 'आझादी का अम्रित महोत्सव' ! यावर आधारित देखावा तयार करून बाप्पाची प्रतिष्ठापना झाली .. दरवर्षीप्रमाणे निमकर दाम्पत्याच्या हस्ते बाप्पाची यथायोग्य पूजा करून कार्यक्रम संपन्न झाला.

सगळेजण ज्या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत असतात तो 'दिवाळी'चा कार्यक्रम आता लवकरच संपन्न होईल आणि त्यासाठी तयारी जोरात चालू आहेच. अर्थात हे सगळे कार्यक्रम संपन्न होताना भक्कम पाठिंबा असतो तो तुम्हा सगळ्यांचा. प्रत्येक कार्यक्रमात स्वयंसेवकांची

भक्कम साथ मिळते तेव्हाच कुठे सगळे नीट पार पडते ,तेव्हा ती साथ अशीच राहू द्या .
आणि हो, योगायोग - गोष्टी जुळून येणे याचा प्रत्यक्ष अनुभव यावर्षी आला तो म्हणजे अत्यंत गाजलेल्या 'मोरूची मावशी ' या नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने . कुणाच्याही ध्यानीमनी नसताना आपण हा प्रयोग करू शकलो ते केवळ तुम्हा नाट्यप्रेमींच्या सहकार्यामुळेच . तुमचे हे प्रेम असेच राहू द्या.

यावर्षी मंडळात अनेक नवीन कुटुंबांनी सभासदत्व घेतले. १०० हुन अधिक कुटुंबे आता मंडळाचे सभासद झाले आहेत. आपले कुटुंब दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे हे बघून विशेष आनंद वाटतो. हा वृक्ष असाच मोठा होत राहो आणि बहरात राहो अशी आशा करतो आणि इथेच थांबतो .
तुम्हा सगळ्यांना दिवाळीच्या पुन्हा एकदा शुभेच्छा आणि तुमच्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत नक्की पोचवा म्हणजे कार्यकारिणी त्यावर नक्कीच विचार करेल .
चला तर मग भेटू आता दिवाळीच्या कार्यक्रमात !

आपला विनम्र ,
हृषीकेश शेंडे



**चार** दोन वर्षे झाली असतील, आमच्या दारापुढे दोन मोठी  झाडं होती. उन्हाळ्यामध्ये छान  सावली मिळायची. त्यामुळे भर उन्हात सुद्धा वाऱ्याची झुळूक मोठी सुखकारक असायची. एकदा संध्याकाळी मी बाहेरील गुलाबांना आणि lawn ला पाणी देत होतो. समोरील झाडाची एक नाजूक फांदी खूप खाली आली  होती आणि त्याची  मला कल्पना नव्हती. मी डावीकडे गुलाबांना पाणी देण्यात गर्क होतो, तेवढ्यात माझ्या मानेला कशाचा तरी स्पर्श झाल्यासारखा वाटला. एखादा किडा असेल अशा समजुतीने मी उजव्या हाताने झटकून टाकायचा प्रयत्न केला.

# मऊ मेणाहूनही

## कुमार कुलकर्णी

थोड्या वेळाने परत तसाच मला भास झाला म्हणून मी किंचित मागे वळून पहिले तर ती खाली लोंबत असलेली फांदीची, अतिशय कोवळी नाजूक चार पांच पानं माझ्या मानेला कुरवाळत होती. माझ्या न कळत  मी म्हटलं,

"I love you too."



मला मोठं नवल  वाटलं. पानं फुलं आपल्याशी कशी छान बोलतात नाही! तेव्हापासून मी गुलाबाचं कटिंग करताना वा बागेतल्या  मिरच्या, टोमॅटो काढतांना त्या रोपांशी बोलत बोलत त्यांना विचारून काढतो. हा प्रसंग एवढ्यावरच संपला नाही.

जे झाड माझ्याशी बोलायचं, त्याच्या खोडाला कीड लागली आणि ती कीड भराभर, वर वर पसरत गेली. मी झाडं कापण्याऱ्या ठेकेदाराला फोन केला. मी आणि माझी पत्नी, आम्हा दोघांच्या मनाविरुद्ध हा निर्णय आम्ही घेतला. झाड कापायच्या आधी मी झाडाशी आपल्या भाषेत बोललो, म्हणालो; असा त्रास सहन करण्यापेक्षा जिथून आपण सगळे आलो त्या मातीशी मिळण्यात धन्यता नाही का? त्या झाडालाही माझं म्हणणं पटल्यासारखं वाटलं आणि मोठ्या जड मनाने त्या ठेकेदाराला झाड काढून टाक असं सांगितलं.

त्यानंतर जवळ जवळ आठ एक दिवस आम्ही बाहेरचं दार उघडलं नाही.



असाच एक दुसरा प्रसंग तीन चार महिन्यापूर्वी घडला. मी बाथरूम मध्ये दात घासताना शेजारी counter वर एक push pin पडलेली दिसली. तिथे ती कशी आली, कुठून पडली असेल ह्याची काही कल्पना मला आली नाही. जागेवर नेऊन ठेवू या असे मी मनात म्हटले खरे, पण आळसामुळे म्हणा किंवा कसे, माझ्या न कळत मी ती pin उचलली आणि समोरील आरश्याच्या उजव्या बाजूला जिथे थोडी जागा होती तिथे टोचली. पण टोचता क्षणीच मी तिथून लगेच काढली आणि जिथे छोटंसं भोक पडलं होतं तिथे हळुवारपणे हात फिरवला. हात फिरवता फिरवता माझ्या डोळयात टचकन पाणी आलं. कारणाशिवाय भिंतीला जखम केली म्हणून मला वाईट वाटलं.

का बरं वरील दोन्ही प्रसंग माझ्या मित्राने मला सांगितले असतील? सम विचाराचे फार थोडे मित्र मला आहेत, त्याच्याशी बोलण्यांत, त्यांचे विचार ऐकताना मला खूप आनंद होतो.

"सत्संग घडो, सुजन वाक्य कानी पडो " असं आपले वाड वडील सांगत आले ते खरंच म्हणायचं तर.

काय योगायोग पहा, आषाढाचा महिना अगदी जवळ आला, एव्हाना श्री ज्ञानेश्वर माऊलीची, संत श्रेष्ठ देहूच्या तुकारामबुवाची आणि अनेक संतांच्या पालख्या पंढरपुराला जायला निघाल्या असतील किंवा निघतील. आळंदी ते पंढरपूर हा प्रवास पायी करतील पण मंडळींना शीण कसा तो जाणवणार नाही, कारण संत शिरोमणी नामदेव महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आणि सावता माळी , चोखोबा आणि सेना, जनाबाई, सोयराबाई ह्या साऱ्यांचे अगणित अभंग आणि हरी नामाचा गजर साथ सोबत करत असताना; कष्ट तरी कुठून असणार?

आमचे हे मित्र गाणारे आहेत, ते ही भान विसरून म्हणायला लागले,

वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरे

पक्षी ही सुस्वरें आळविती

मग काय तासांमागून तास कसे गेले ते कळलेच नाही.


माझ्या मित्राचे हे आचार विचार आणि त्याच्या चेहऱ्या वरचे सात्विक भाव मला अजून मोहवतात.

शुभं भवतु, मंगलं भवतु ॥






vikrant sawant


vikrant sawant



मंडळी, नमस्कार

अत्यंत भाग्यवान आहात सर्वजण .. कारण एक - तुम्ही स्वतंत्र भारतात जन्माला आलात आणि दोन - आज भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे पूर्ण झालेली पाहत आहात. पण मी तुमच्यापेक्षाही भाग्यवान आहे बरं का , कारण हिंदुस्थान स्वतंत्र होताना मी पहिला आहे, पहिल्या स्वातंत्र्यदिनी मी हजर होते.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## वसुधा जोशी

१४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री नऊ -साडे नऊ ला घराघरातून लोक नटून थटून स्वतंत्रता देवीचे स्वागत करण्यासाठी बाहेर पडले होते. मी तेव्हा १३ वर्षांची होते . आम्ही मुले-मुली नाशकातल्या कापडपेठेच्या टोकाशी असलेल्या आणि सरकारवाड्यासमोरील मारुती मंदिराजवळ गप्पा मारीत १२ केव्हा वाजतात आणि सरकारवाड्यावर झेंडा केव्हा फडकतो याची वाट पाहत बसलो होतो . बोहोरपट्टी , कापडपेठ , मेनरोड अगदी सगळीकडे जिथे जागा असेल तिथे दुकानाच्या गेल्या . दारांना तोरणे लागली. सगळीकडे उत्साही वातावरण होते. सगळे लोक आवरून देवदर्शनाला फळ्यांवर माणसे बसली होती. इमारतींच्या खिडक्या , गच्चीवर माणसे दिसत होती. आम्ही मारुतीजवळ मोक्याची जागा पटकावली होती.

घड्याळाचा काटा पुढे सरकत होता आणि आमची उत्सुकता शिगेला पोहोचली होती आणि अखेर काटा बाराच्या पुढे गेला . एकदम बिगुल वाजला , ढोल ताशे वाजले आणि सरकारवाड्यावर तिरंगा फडफडला . टाळ्यांचा कडकडाट झाला , जय हिंद चा घोष सुरु झाला , माणसे नाचू लागली , एकमेकांना मिठ्या मारू लागली . डोळ्यात , कानात साठवून ठेवावा असा प्रसंग होता तो... दास्यातून सुटल्याचा आनंदोत्सव !

मात्र हे स्वातंत्र्य काही सहजासहजी मिळाले नव्हते बरं का . यासाठी अनेकांनी प्राण खर्ची घातले, अनेकांची आयुष्ये उध्वस्त झाली. वासुदेव बळवंत फडके , स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर , त्यांचे जेष्ठ बंधू बाबाराव सावरकर हे तर अगदी आपल्या जवळचे भगुर गावातले. जन्मठेप होऊन अंदमानला पाठविले गेले . तेथे त्यांचे अतोनात हाल झाले. त्यांचे साथीदार कर्वे आणि देशपांडे. Jackson च्या वधात अनंत कान्हेरे फाशी गेला. रँड च्या वधात चाफेकर बंधू फाशी गेले . असे अगणित क्रांतिकारक स्वातंत्र्यासाठी झुंजले तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले .

१५ ऑगस्ट १९४७ - दुसरा दिवस वेगळाच उजाडला . आपला गुढी पाडवा असतो तसा वाटला . घरासमोर सडे पडले , रांगोळ्या घातल्या

निघाले होते , देवाचे आभार मानायला. दुपारी १२ वाजता स्नेहभोजनाच्या पंक्ती उठत होत्या.

गप्पांचे फड रंगले होते .रात्री गाण्याच्या मैफिली भरल्या होत्या . मुक्त वातावरण काय असते ते जनता अनुभवत होती . शाळाशाळातून मुलांकडून वंदे मातरम हे गीत म्हणून घेतले गेले. जय हिंद च्या घोषणा दणदणल्या . वातावरणातला हा बदल प्रकर्षाने जाणवत होता.

असे हे स्वातंत्र्य आज ७५ वर्षे आपण अनुभवत आहोत . परंतु हे टिकवण्यासाठो सीमेवर जे सैनिक प्राणाची बाजी लावून , तहान भूक विसरून, थंडी वारा पाऊस याची पर्वा न करता आपल्या देशाचे रक्षण करतात म्हणून आपण शांततेत आणि आनंदानी जगू शकतो. तेव्हा त्या सैनिकांची आठवण आपण ठेवलीच पाहिजे आणि त्यांच्यासाठी , शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबासाठी आपण काय करू शकतो याचाही विचार केला पाहिजे.

भारताचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी आणि फुलवण्यासाठी आपण वाईट गोष्टींना दूर सारून चांगल्या गोष्टींचा अवलंब केला पाहिजे. तुम्ही सर्वांनी भारत देशाचा अभिमान बाळगा , देशाची प्रगतीच होईल या दृष्टीने वाटचाल करा. चांगल्या गोष्टींचा , शिस्तप्रिय वागण्याचा पुरस्कार करा. अशानेच आपला भारत देश आणखी पुढे जाईल !

हे राष्ट्र देवतांचे ,हे राष्ट्र प्रेषितांचे ... आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे !!!




देखावा : उर्वी दखणे

# कलरवची पहाट

प्रकृतीच्या प्रेमात कधी मी
पडले

हे माझेच मला न कळले.

रम्य पहाट पाहता माझे मन

आनंदाने ओसंडले.

पूर्वे कडे नजर जाता
तप्तलोहाचा गोळा

वृक्षा मधून डोकावला.

रविकिरणे झेलाया उषाराणीने

गुलाबी पदर पसरला.

हिरव्या शालूत सजली वसुंधरा
निघाली

भास्कराच्या मिलनाला.

चिमण्या-राघू, पक्ष्यांचे थवे
संगीत

छेडत लगबगीने निघाले
भेटाया मित्राला.

पारिजाताने पुष्पांचा पायघड्या घातल्या

आदित्याच्या स्वागत आला.

पलीकडे कोपऱ्यात मयूरही नृत्य करीत असे

भानू साठी फुलवूनी पिसारा.

कपिराजही वादी वृक्षा वरुन आम वृक्षावर

हुंकार करीत जणू बोलावतात सूर्याला.

दृशा निहाळता मनाने विचारले मनाला

स्वर्ग याहून असेल का वेगळा?

आत्मारामने उत्तरले तू

प्रत्यक्षा परमेश्वर पाहिला

कलरवची रम्यपहाट सदैव

अशीच राहो मी प्राचीला 'श्रीचरणाला'!

कवियत्री सौ: चारुलता मुजूमदार


vikrant sawant


vikrant sawant



# कृष्णापेक्षा मला अर्जुन हवाय, रामापेक्षा मला भरत हवाय ! - अजित नातू

होय, आज मला कृष्ण नाही तर अर्जुन हवाय, आज मला राम नाही तर भरत हवाय.



मला पूर्ण माहित आहे कि असे बोलणे काही जणांना रुचणार नाही अन् मी ते पूर्ण समजू शकतो.

पण मी काय सांगतो ते शेवटपर्यंत वाचा, विचार करा.

कदाचित तुमचे मत बदलेलच असेही नाही पण माझी भूमिका तरी समजू शकेल कि मी इतके धाडसाचे विधान का करत आहे.

पहिल्यांदाच एक मनापासून सांगतो कि राम आणि कृष्ण हि माझी दैवते आहेत. ज्या रामकृष्णाचे जीवन आज हजारो वर्षे झाली तरीसुद्धा समाजाला सन्मार्गावर चालायला नुसते दर्शवत नसून, तसे का करायचे हे समजवतात, त्यांचे जीवन हाच एक अमोल ठेवा आहे, मार्गदर्शक आहे. मी तर रामकृष्णाचा भक्त आहे, नुसता रामनाम घेताना, फोनमध्ये असणारा नव्हे तर त्यांच्या जीवनाचा अभ्यासक, त्यांचे विचार आचरणात आणण्याचा प्रयत्न करणारा असा मी आहे. अन् तरी सांगतो, अहो आज समाजासाठी, जगासाठी मी रामकृष्ण, सीता नाही मागत तर अर्जुन, भरत, लक्ष्मण, उर्मिला मागतो. अर्थात का ते पुढे सांगतोच आहे.

कृष्णाने अर्जुनाच्या मदतीने धर्माचे रक्षण केले, रामाने रावणवध करून रामराज्याची मुहूर्तमेढ रचायला सुरुवात केली. पण ते तसे का करू शकले? कृष्णाने तर हातात शस्त्र न घेता क्रांती घडवून आणली. पण त्याला ते करायला, समर्थ, विचार जुळणारा, स्वतः धर्माने चालणारा, विवेकी असा अर्जुन मिळाला म्हणून. कोठलाही नेता एकटा क्रांती करूच शकत नाही. समविचारी, निरहंकारी, समर्पण करणारा, संकटे आली तरी पक्ष न बदलणारा असा समर्थक, जीव देणारा, सक्षम असा साथीदार नसेल किंवा नसतील तर कृष्ण काय, राम काय, शिवाजी काय, क्रांती, स्वराज्य अन सुराज्य प्रस्थापित करू शकले नसते.

कृष्ण तर महान होताच तसेच अर्जुन कमी नव्हता! उगाच नाही कृष्णाने अर्जुनावर विश्वास टाकला. अरे गेले हजारो वर्षे लोक, तत्वज्ञ, संत, पंथीय गीतेचा अभ्यास करत आहेत तरी आज गीता समजायला वर्षे

लागतात, पारायणे करायला लागतात, तसे वागायला लागते. पण लक्षात घ्या, कृष्णाने अख्खी गीता अर्जुनाला एकदा, तेसुद्धा रणांगणात, बाजूला लाखो सैन्य असताना कथन केली व अर्जुन तयार झाला, वैचारिक बैठक तशी त्याची होती अन् म्हणूनच त्याच्या हातून धर्मरक्षण झाले. का? कारण अर्जुन लायक होता, सक्षम होता तसेच त्याला पण योग्य मार्गाने चालून राज्य मिळवायचे होते व राज्य करून प्रजेला खऱ्या अर्थाने सुखी, समृद्ध करायचे होते म्हणून. "आई" केंव्हा होते तर केवळ बाळ जन्मल्यावर, त्या आधी ती केवळ स्त्री असते. तसेच अर्जुन होता म्हणून भगवतगीता आली, म्हणून कृष्णाला ती सांगावीशी वाटली. आपण लायक होऊया, आपले नेते अर्जुनासारखे सज्जन, समर्थ असू द्या, मग कृष्ण गीतेत आहेच मार्ग दाखवायला. प्रत्येक जण कृष्ण झाला, प्रत्येक जण राम झाला तर लढणार कोण? क्रांती घडवणार कोण? इतिहासाची नुसती गोडवी गाण्यापेक्षा, बाते नुसती करण्यापेक्षा काहीतरी करून दाखवूया, युद्ध दूर पण रणांगणावर तर या, येऊया? युद्ध तर दूर पण सेतू बांधायला एक स्वतःचा 'राम' लिहिलेला दगड तर आणण्याचे कष्ट घ्या, घेऊया!

राम वनवासात गेल्यावर भरत राजा होणार होता. झाला असता तर कोणीच आक्षेप घेतला नसता कारण त्याचा काहीच दोष नव्हता. तरीपण रामाच्या पादुका मागून घेऊन त्या सिंव्हासनावर ठेवून, आलिशान महाल असून केवळ राम वनवासात तसा झोपत असेल म्हणून पर्णावर रात्र काढणारा भरत आज मिळेल? मी तर म्हणतो ती १४ वर्षे नैतिकतेने भरताने राज्य केले म्हणून रामराज्य यायला नक्कीच मदत झाली. भरताने संपूर्ण मुभा असून मनमानी न वागता, आपलीच गादी न चालवता, लोकांचे राज्य केले. असा भरत आज अस्तित्वात आहे? आजचे राजकारणी, नेते बघा मग समजेल मी भरत का मागतो, इरसाल, स्वतःची तुमडी भरणारे लोक, स्वार्थी लोक, वाईट मार्गी लोक बघून म्हणावेसे वाटते कि आज लोकांमध्ये अर्जुन हवा, आज हजारो भरत हवे, जे नेता असो वा नसो योग्य वागतील, सत्कार्य करतील.

सीता पतीबरोबर वनवासात गेली. राम स्त्रीहट्ट म्हणून सोन्याचा मृग पकडायला गेला. काय उर्मिलेला स्त्रीहट्ट नसता करता आला? पण पत्नी म्हणून कटकट न करता, रामाचे रक्षण करायला केवळ आपला पती, लक्ष्मणच योग्य म्हणून १४ वर्षे विरह सहन करणारी उर्मिला होती म्हणून रामाचे रक्षण झाले, धर्माचे राज्य रामराज्य यायला मदत झाली. सीता जशी अजोड, तशीच उर्मिला वंदनीय!

जरा विचार करा, अर्जुन नसताच तर? अपेक्षा नसणारा भरत नसताच तर? भरल्या संसारात १४ वर्षे पतीचा - लक्ष्मणाचा - विरह आतल्याआत सहन करणारी उर्मिला नसतीच तर? तानाजी, बाजीप्रभू नसतेच तर? एक वेगळाच इतिहास वाचायला मिळाला असता व आपण आत्ता जे आहोत तसे कदाच नसतो.

आज सगळेच कृष्ण बनत आहेत, सगळेच तत्वज्ञान दुसऱ्याला सांगायला बघतात, गीता एक असली तरी हा पंथ, तो पंथ, माझाच खरा पंथ असा समाज वाढत चालला आहे. आजचा माणूस कोण झाला आहे? नो नो, मला कृष्णाचा अर्जुन नाही व्हायचे, मला लढाई नाही करायची, मी कोचावर बसून, बाहेर क्रांती का होत नाही बर आणि कोणी नेता समर्थ का मिळत नाही बर, असे म्हणत, अस्मितारहित बोटांनी फक्त टीव्ही चॅनेल

बदलतो. मधेच कधी अण्णा हजारे आले तर दोन दिवस 'अच्छे दिन आयेंगे' ची स्वप्ने मी बघतो, ‘काश्मीर फाईल’ बघून दोन दिवस तापून निघतो पण 'फील अप काश्मीर '(काश्मीरमध्ये वास्तव्य) करायला सांगितले तर लिव्ह ऑफ ऍब्सेन्स! अरे माणसा तू अर्जुन होशील तर सुराज्य मिळेल. काय तु बाजीराव होऊन लढशील? भरत होऊन नेता बनशील?


म्हणून म्हणतो, आज कृष्ण नव्हे तर अर्जुन हवा, कालची भगवद्गीता आजच्या अर्जुनांची वाट बघत आहे, तरच सुखासमाधानाचा राजसूय यज्ञ होईल. म्हणून म्हणूया कि आज रामाच्या राज्यावर अधिकार न मागता, फक्त पादुका मागणारा भरत हवा आहे, तरच पुन्हा रामराज्य निर्माण होईल. पादुकाच का भरताने मागीतल्या ह्याचा कधी कोणी विचार केला आहे? रामाची शाल का नाही मागितली, धनुष्य का नाही मागितले?




चित्र : मृदुला चोरडिया

कारण ‘पादुका’ म्हणजे रामाच्या मार्गावरून चालण्याचे साधन! राममार्ग तोच माझा मार्ग असे सुचवणारा प्रतीकात्मक संदेश! आहेत आज असे अर्जुन? बनुया असे अर्जुन? बनाल असे भारताचे भरत?

म्हणून..... होय आज मी अर्जुन मागतोय, आज मी भरत मागतोय!.... एक नाही, अनेक!






vikrant sawant


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
vikrant sawant

अमृताच्या दोन थेंबांनी अमरत्वाची ग्वाही

विषाच्या दोन थेंबांनी मृत्युची हमी.

कधी कोण जाणे या फिरणाऱ्या ग्रहावरील
माणसाला भुरळ पडली अमृताची.

# अमृत आणि विष

## शिरीष देशपांडे

आणि मग तो हजारो वर्ष ह्या ग्रहावर फिर फिर फिरला,

कोपरान कोपरा उचकटला, विस्कटला.

पडला, धडपडला, उठला, धावला - शेवटी थकला..

पण नाही मिळालं त्याला अमृत.

तो निराश, पराभूत झाला. त्याचा विवेक संपला.

आणि एका अवलक्षणी क्षणी त्याने

विष आपल्या ओठाला लावलं.

अर्थात, त्याचा मृत्यु अटळ होता

पण जाता जाता तो माणसाच्या वृत्तीत

अतृप्ततेचं विष पेरून गेला.

त्यातून जन्माला आली भ्रमिष्ट, विकृत माणसं -

पशुलाही लाजवणारी.. आपलीच माणसं चिरडणारी

त्यांना रक्त ओकायला लावणारी. सगळं उध्वस्त करणारी.

त्यातच एक होता सिकंदर, तर एक अलेक्झांडर

कोणी होता चेंगीझ खान, बाबर, हिटलर, कोणी लादेन.

अनेक वंश, अनेक नावं ..

आणि काय आश्चर्य, हे सगळे इतिहासात अमर झाले.

विष पिऊन अमरत्व मिळतं हे जगाला दाखवून गेले.

येशू, बुद्ध, महावीर, पैगंबर, गांधी आणि कितीतरी

शांतीचा, प्रेमाचा, अहिंसेचा, मानवतेचा संदेश देऊन

काळाच्या उदरात लुप्त झाले.

पण, शतकानुशतके अतृप्ततेचं विष भिनलेल्या
माणसाला हे नाही उमगले.

माझ्या प्रिय माणसा, एक क्षण थांबशील ?

थोडा विचार करशील?

हे अथांग महासागर, विस्तीर्ण पर्वतरांगा, दुथडी
भरून वाहणाऱ्या नद्या,

अवकाशातले चंद्र-सूर्य-तारका, वृक्षवल्ली, पक्षी,
पाऊस, वारा, फुलं-पानं

आणि अमृताच्या चवीची रसाळ फळं ...

हे सर्व तुझ्यासाठी. मग, का तुला आस असावी हे
नष्ट करण्याची?

फक्त अमृत मिळालं नाही म्हणून?

अरे वेड्या, तो झरा पाहिलास?

भर तुझी ओंजळ आणि कर त्या पाण्याचं
मनसोक्त प्राशन,बघ, एका क्षणात होईल तुझ्या
मनातल्या विषाचं अमृत!


स्वामी विवेकानंद हे ज्या योग विद्येचे मूर्तरूप होते त्या राजयोगाची आज थोडक्यात ओळख आपण करून घेवूयात. सर्व मंडळींकरता याचे गृहस्थाश्रमामधील दोन फायदे आपण उलगडू; जेणे करून आपल्याला या योगाची शैली लक्षात येईल.

# राजयोग

## श्रीधर जगदाळे (ऊर्फ अमृतप्रीत)

लोकमान्य टिळकांनी भगवद् गीतेचा अनुवाद "गीता रहस्य" या ग्रंथात केलेला आहे. महात्मा गांधीजींच्या हाती नेहमी भगवद् गीता असे. बऱ्याच मंडळींना ज्ञात नसेल परंतु, वीर सावरकर यांनी देखील गीतेचे अनुवादन केले आहे. या व्यक्तींच्या विचारांची आणि कर्तृत्वाची व्याप्ती आपणास सर्वश्रुत आहे. एवढेच काय तर, पंडीत नेहरूंनाही कैवल्य अवस्थेविषयी ज्ञान होते. त्यांच्या "डिस्कवरी ऑफ इंडिया" या पुस्तकात याचा उल्लेख आढळतो. लाला लजपत राय, सुभाषचंद्र बोस यांचा भगवद् गीतेचा गाढा अभ्यास होता. या सर्व मंडळींमधे साधर्म्य काय आहे तर ते म्हणजे भारतीय संस्कृतीविषयी भगवद् गीता अथवा पतंजली योग सूत्र या रूपाने असलेले ज्ञान.

आपण भगवद् गीता कधी साधी हातीही घेत नाही. भगवद् गीतेमधील सर्व अठरा अध्यायांचे शीर्षक, योग हे आहे;




सांख्ययोग, कर्म-सन्यास योग, अक्षरब्रम्ह योग, ज्ञान-विज्ञान योग इत्यादी इत्यादी.

असे म्हटले आहे की, वेद हे भारतीय संस्कृतीमधील ज्ञानाचे लिखित भंडार आहे. उपनिषेद हे वेदांमधील एकेक विषयावर केलेले विश्लेषण आहे. आणि भगवद् गीता यातील प्रमुख ज्ञानाचे सारांश आहे. त्यामुळे भगवद् गीता जरी समजण्याचा यत्न केलात तरी या जीवनाचे कल्याण होईल. गुरु मिळाल्यास उत्तम; लवकर मिळाला तर अतिउत्तम. परंतु गुरु नसेल तरीही भगवद् गीतचे वाचन आणि चिंतन करणे उपयोगी ठरेल.

आज आपण ध्यानयोगातील एक विशेष अंगाची म्हणजे राजयोगाची ओळख करून घेऊ.

"योगा करा" असं ऐकलं की आपण योगासने यांचा विचार करतो. योगासने ह-ठ योग या प्रकारामधे येतात. यात

आपल्यातील सूर्य (ह) आणि चंद्र (ठ) यांचा समतोल राखणे आणि नाडी शुद्धीकरण करणे हे उद्दिष्ट आहे. आपल्या आत्म्याचा एकमेव रथ जे

हे शरीर आहे ते सुद्रुढ आणि लवचिक राहिल्यास जीवनाचा अनुभव अधिक आनंदी होतो.



“ध्यान करा” असं ऐकलं की डोळे मिटून ओमकार करावा असा सर्वसामान्य समज आहे. परंतु डोळे मिटून काय करायचे हे माहित नसते. सर्व प्रथम योग का करावा? “अति दुःख निवृत्ती आणि परम् आनंद प्राप्ती” या करता योग करावा असे म्हटले आहे. ध्यान योग विषयी तुम्हाला विशेष माहिती कुठे उपलब्ध होणार नाही. ही शिक्षा गुरु-शिष्य परंपरेत दिली जाते. खरे तर समाधिस्थ होणेकरीता, शून्य अवस्थेत जाणे हा उद्देश असतो. शून्य अवस्थेत मनात काही विचार नसतो. परंतु दैनंदिन चर्येत आपण सकाळी जागे झाल्यापासून, आपले विचार हेच आपली कृती ठरवतात. त्यामुळे आपण आत्ता या सहज करता येणाऱ्या गोष्टीवर भर देऊ : सूक्ष्म विचार. अपेक्षा, आनंद आणि दुःख.

ज्यावेळी आपल्या मनाप्रमाणे गोष्टी घडतात त्यावेळी आपल्याला आनंद होतो. आपल्या मनाविरुद जेव्हा गोष्टी जातात, तेव्हाच राग येतो अथवा दुःख होते.

याचाच अर्थ, फळाची अपेक्षा केली आणि अपेक्षित फळ मिळाले की आनंद मिळतो आणि अपेक्षित फळ नाही मिळाले तर दुःख मिळते. आपल्या मनाच्या अवस्थेविषयी असे प्रत्येक क्षणी अवगत राहणे हा अत्यंत उपयुक्त गुण आहे. ती मनाला नकारात्मक विचारांत भटकू देत नाही. फळांची अपेक्षा करावी, नाहीतर कर्म करण्याचा उद्देश नष्ट होतो. परंतु ते फळ न मिळाल्यास मनाला जास्त भटकू देऊ नये. कर्म करणे आपल्या हातात आहे. परिणामावर इतर गोष्टी प्रभाव टाकू शकतात.

त्यामुळे ते फळ मिळवण्याकरता नवीन मार्गाचा अवलंब करावा. काही वेळा फळ मिळण्याची आवश्यकता ही नसते. त्याकरता फार जास्त उठाठेव करण्याची गरज नाही. उदाहरणार्थ, भारत आणि पाकिस्तान मॅचचे काहीही परिणाम झाला तरी तुमच्या मनाच्या अवस्थेत फार फरक पडण्याची आवशक्यता नाही. परंतु यातून सुटका होणेकरता अहंकारातून सुटका होणे गरजेचे आहे. अहंकार म्हणजे गर्व नव्हे. त्यामुळे अंहकार (आयडेंटिटी) काय आहे याचा शोध घ्या.

एकाग्रता : प्रत्याहार, धारणा

याचा उपयोग विद्यार्थी आणि विशेषतः बौद्धिक काम करणाऱ्या लोकांना होतो. एका वेळी अनेक कामे करणे (मल्टिटास्किंग) हा एक प्रभावी गुण मानला जातो परंतु तो जास्त हानिकारक आहे. श्रवन आणि वाचन करताना इतर कुठलाही विचार किंवा क्रिया करता कामा नये. त्यानंतर डोळे मिटून चिंतन करणे अतिआवश्यक आहे. यालाच “मेडीटेटिंग ऑन अ टॉपिक” म्हणू शकतो. याने बऱ्याच किचकट प्रश्नांची उत्तरे मिळतील. आपण

काय वाचलं ते आठवणे, आणि का वाचलं यावर विचार करणे. मॅक्रो इकॉनॉमिक्स, इंटरेस्ट रेट, मार्केटवर परिणाम आणि त्या अनुषंगाने आपली व्यूहरचना याची उत्तरे यातून मिळू शकतात. तसेच ऑफिस मधल्या कॉल वर असताना महत्वाच्या वेळी फक्त त्या संभाषणाकडेच लक्ष दिले तर काही विषय पहिल्यांदा ऐकूनही त्याचे त्वरीत आकलन होते. अशा सर्व लोकांना अतिहुशार हीच ओळख प्राप्त होते.

परमोच्च ज्ञानाच्या मार्गाची वाटचाल ही प्रत्येकाला स्वतःच करावी लागते. परंतु सूक्ष्म विचारांचे ज्ञान आत्मसात करून आपणास स्थिरबुद्धी होण्यास मदत होते. तद् नंतर स्थितप्रज्ञ होणे शक्य आहे. सर्व ज्ञानाचा परिचय हा स्वतः करून घ्यावा अथवा योग्य गुरूने करून द्यावा. काहीच मार्ग न सापडल्यास अद्वैत वेदान्त च्या मार्गस्थ व्हा. स्वामी विवेकानंदानी, सांख्यिकांसाठी सर्वोत्तम लेखन करून ठेवलं आहे. भगवद् गीतेचा अभ्यास हा थोडा जोखमीचा आहे. संत ज्ञानेश्वरांनी गीतेचे अनुवादन ज्ञानेश्वरीत केले आणि तद् नंतर एकविसाव्या वर्षी समाधी घेतली. भगवद् गीता जशी जशी समजते तसा तसा वैराग्यभाव ठायी येतो. त्या अनुषंगाने

भौतिक आणि सांसारिक जगाविषयी अनासक्ती उत्पन्न होवू शकते. परंतु संत न होता वीर राहण्याचा भाव ठायी अंगिकारला तर आपली नौका अनासक्ती कडे भटकणार नाही. नाहीतर समाधीच्या समुद्रामधे जीवन नौका सहज विहारत

जाईल. ज्यांना लहान मुले आहेत आणि इतर सांसारिक जबाबदाऱ्या वगैरे आहेत, त्यांनी तर याकडे विशेष लक्ष द्यावे. गृहस्थामश्रमात सांसारिक गोष्टीत रमावे जेणे करून आपल्या जबाबदाऱ्यांचा त्याग होणार नाही. मनुष्य हा प्राणी योगी, भोगी अथवा रोगी असतो. या अवस्था इंद्रिय-विषयांच्या आपण किती आहारी गेलो आहोत यावर ठरते. गृहस्थाश्रमामध्ये भोगी असावे. योगी झालात तर कठीण होईल. भगवान श्रीकृष्णाने देखील कर्मयोग आणि ध्यानयोग मध्ये कर्मयोगाला श्रेष्ठ म्हटले आहे. भगवद् गीता सर्वव्यापी आहे. त्याच्या मार्गस्थी लागलात तर उत्तम कर्म समिधा या जीवनाच्या अग्नीकुंडामधे समर्पित होतील. माझा योग विषयी परिचय तसा उशिराच झाला. तुमच्या मुलांना मिळालेले रंग आणि रूप ही भारतीय उपखंडाची देणगी आहे. त्याच उपखंडातील सर्वोत्तम ज्ञान संपत्तीचा उपयोग तुम्हाला आणि तुमच्या मुलांना या अमेरिकन उपखंडात व्हावा या करता माझ्या लेखकर्माची ही समिधा मी अर्पित आहे.

तुम्हाला आणि तुमच्या परिवाराला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!!

आपला स्नेहांकित,

श्रीधर जगदाळे (ऊर्फ अमृतप्रीत)

नमस्कार,

सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!




"**केल्याने** होत आहे रे आधी केलेची पाहिजे" या म्हणीचा अर्थ खरा करून दाखवणाऱ्या आणि सामूहिक प्रयत्नांना आलेल्या यशाचे एक उत्तम उदाहरण म्हणजे आपली सॅक्रमेंटो मराठी शाळा. आज नॉर्थ अमेरिकेतील मराठी शाळांपैकी एक शाळा.

साता समुद्रापार वास्तव्यास असलेल्या नव्या पिढीला आपली मातृभाषा लिहिता, वाचता व बोलता यावी हे या मागचे ध्येय. हे ध्येय गाठण्यासाठी २०१२ मध्ये मराठी शाळा सुरु झाली. आपल्या मराठी शाळेसारख्या अजून अनेक शाळा अमेरिकेतील बऱ्याच शहरात आहेत. संपूर्ण अमेरिकेतील मराठी शिकणाऱ्या मुलांना एकच अभ्यासक्रम असावा यासाठी भारती विद्यापीठ पुणे यांच्या सहयोगाने आणि सहमतीने अभ्यासक्रम तयार केलेला आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळ (बीएमएम) आणि भारती विद्यापीठ यांच्या वतीने तयार केलेला अभ्यासक्रम शाळेला मिळाला आणि बीएमएम च्या परीक्षा घेणे अधिकृतपणे सुरु झाले.



पूर्वी विद्यार्थी संख्या मर्यादित असल्याने काही वर्ग आपले शिक्षक त्यांच्या घरी घेत असत. परंतु हळूहळू विद्यार्थी संख्या वाढत गेल्यावर आपण रीतसर मराठी शाळा वर्गात घेऊ लागलो. सध्या पँडेमिकच्या काळात आपणही इतर शाळांप्रमाणेच ऑनलाइन वर्ग घेत

आहोत. या शालेय शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त मुलांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा म्हणून चित्रकला स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पत्र-मित्र प्रकल्प, मराठी भाषा दिन, वार्षिक स्नेहसंमेलन, वार्षिक सहल अश्या उपक्रमांचे आयोजन करतो.

२०२१ या वर्षाचं विशेष कौतुक म्हणजे आमची इयत्ता पाचवीची पहिली batch चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. यावर्षी १२ऑगस्ट २०२२ ला आपण शैक्षणिक वर्ष चालू केले. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शाळेचा निकाल १००% लागलेला आहे. २०२२ बीमम कॉनव्हेंशन अटलांटिक सिटी न्यू जरसी येथे नुकताच पार पडलेल्या सोहळ्यातआपल्या शाळेच्या विदयार्थ्यांनी व इतर शाळेतल्या मुलांनी एकत्रित पणे मराठी समूहगीत सादर केले. दिवाळी साठी पणती रंगवून पाठवणे हा उपक्रम देखील शाळा यावर्षी करवून घेत आहे.

मागील काही वर्षात साधारण ४० ते ५० विद्यार्थी दरवर्षी बीएमएमची परीक्षा देतात. या यशस्वी उपक्रमाचे श्रेय २०१२ पासूनचे सर्व शिक्षक , स्वयंसेवक , पालक, स्थानिक मंडळ अधिकारी आणि बीएमएम कार्यकारिणी सदस्य यांच्या परिश्रमाला आणि निष्ठेला जाते. शाळेचा हा वटवृक्ष असाच बहरत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना! धन्यवाद!

अधिक माहितीसाठी संपर्क करा mmsac.shala @gmail.com







# बालमित्र

इरा कुलकर्णी



आर्य कुलकर्णी





अस्मि चोरडिया



शनाया राणे



# प्लास्टिक बंदी ? एक विचार - साहिल शेंडे

नमस्कार ,माझे नाव साहिल शेंडे आहे. मला काही दिवसांपूर्वी प्रश्न पडला, प्लॅस्टिकची बंदी करायला पाहिजे का? मग मी त्याचा विचार केला.

पहिल्यांदा वाटले कि plastic ची बंदी करायलाच पाहिजे पण मग वाटले की आपल्याला खूप गोष्टी अवघड पडतील. उदाहरणार्थ स्वयंपाकघरात'अशा'खूप'वस्तू'आहेत'त्या'प्लॅस्टिकच्या'असतात'. जसे की कप ,डबे ,टिफिन आणि बाटल्या.आपण शाळेमधेही खूप प्लॅस्टिकच्या वस्तू वापरतो.

मग मी संशोधन केले. पूर्वीच्या काळी प्लास्टिकचा शोधच लागलाच नव्हता, मग त्यांनी काय केले असेल ?मी आजीला विचारले. ती म्हणाली की तिच्या लहानपणी प्लास्टिकचा शोध झाला होता पण कुणी वापरत नव्हते. सगळ्या गोष्टी धातू पासून बनवल्या होत्या त्यामुळे प्लास्टिकचा अजिबात वापर होत नव्हता .

प्लास्टिक आपल्या समुद्रांना दूषित करते. प्लास्टिक bio -degrade होत नाही त्यामुळे ते पृथ्वीला दूषित करते . मला असं वाटतय कि आपण प्लॅस्टिकची बंदी करू शकत नाही पण आपण ते कमीत कमी वापरु शकतो , तुम्ही पण प्रयत्न करून बघा ,मीही करणार आहे .

साहिल शेंडे (वय - १० वर्षे)

# जीवनाची लढाई

## आर्णव दाबके

युद्ध भडकलय

सैनीक युद्धभूमीकडे कूच करताहेत

मी पण त्यांच्यातलाच एक,

कारण मी जीवनाची लढाई लढतोय!

अन्न्यायाच्या प्रतीकारची ठिणगि पेटली

सैनीकानी हल्ला बोलला

मी त्यांच्यातला एक,

कारण मी जीवनाची लढाई लढतोय!

तलवारी भिडल्या

तोफा धडधडताहेत

मी गोळीबार करतोय

कारण मी जीवनाची लढाई लढतोय!

भडकलेली आग विझली

बॉम्ब निष्क्रीय झाला

युद्ध विराम झाले

आणि मी जीवनासाठी लढलो!

मी माझ्या तुकडीतल्या सैनिकांची प्रेत पाहतो

ती खांद्यावर टाकून त्यांच्या

थडग्यासाठी खड्डे खोदतो

ती प्रेत खांद्यावर घेऊन थडग्यात टाकतो


मी जीवनयशठी लढायला गेलो

पण मृत्यु साठी लढलो.

कवि: आर्णव दाबके

इंग्लिश ते मराठी स्वैर भाषांतर: वसंत दाबके





सिद्धांत नाईक





विवान शेंडे




(916) 235-6212








CHICAGO'S PIZZA
With-A-Twist

sanskrit
new age indian




Curry Bowl

मित्रांनो ,तुमच्या आवडीची रांगोळी तयार करा आणि छानसे रंग भरून आम्हाला पाठवा
mmsac.abhiruchi@gmail.com

